**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.६ जुलै ते १० जुलै २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक
श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२७३ ■ सोमवार ६ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26




घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध घी...स्वास्थ्य रहा
नवल
शुद्ध घी
म्हशीचे व गायीचे साजूक तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# राम मंदिरातील दान चोरी झाँकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील - उद्धव ठाकरे




**मुंबई, दि. ५ : अयोध्येथील श्रीराम मंदिरातील दान चोरीच्या विरोधात उद्धव ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून रामरक्षा आंदोलन करण्यात आले. दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती तसेच रामरक्षा स्त्रोत आणि हनुमान चालीसा, मारुती स्त्रोत पठणाने राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाषण करताना, जमलेल्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो अशी सुरुवात केली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी देशातील तमाम हिंदूंना जागे केले होते, विखुरलेल्यांना एक केले होते, आजही तो क्षण आपल्या डोळ्यासमोर आहे. राम मंदिरातील चोरीवर लक्ष वेधत उध्दव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली. ठाकरे म्हणाले, अयोध्येतील राम मंदिरातीन दान चोरी झाँकी असेल तर काशी मथुरेत किती लुट होईल, असा प्रश्न ठाकरेंनी उपस्थित केला.**

आपण कट्टर कडवट देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आहोत, भाबडे आहोत पण मूर्ख नाहीत. आपल्या हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन जर कोणी मंदिर लुटत असेल तर मी परवाच बोललो, अब हिंदू माफ नही करेगा. या देशाची सत्ता घेताना जय श्रीरामच्या घोषणा दिल्या, मंदिर वही बनायेंगे, असेही म्हटले गेले. पण तेव्हा शिवसैनिकांनी जेवढे काम केले, मला नाही वाटत तेवढे दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केले असेल. शिळा पुजन, रथयात्रा, अयोध्येत जाऊन कारसेवा केली होती, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

**हिंदू आजही भरडला जातोय**

मुंबई शहराने जे भोगले ते क्वचित एखाद्या शहराने भोगले असेल. बॉम्बस्फोट झाले, दंगली झाल्या, तेव्हा देशातील एकच मर्द शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हिंदूंच्या पाठीशी उभे राहिले होते. हिंदू भयग्रस्त होता, हिंदू आक्रमित होता, तेव्हा **(पान ४ वर)**

## नागपूर मध्ये कुटुंबातील पाच जण घरातून गायब

नागपूर, दि. ५ : उपराजधानी नागपूरच्या धंतोली परिसरात राहणाऱ्या एका कुटुंबातील तब्बल पाच जण चोवीस जूनपासून अचानक बेपत्ता झाले आहेत. गेल्या अकरा दिवसांपासून या पाचही जणांचा कोणताही पत्ता लागलेला नाही. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. धंतोली पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात या सर्वांचे शेवटचे मोबाईल लोकेशन थेट पुणे येथे दाखवत असल्याने पोलिसांचे एक पथक तपासासाठी रवाना झाले आहे.

धंतोली परिसरात एकाहत्तर वर्षीय श्यामसुंदर परसवानी कुटुंबासह राहतात. त्यांच्याच घरात त्यांचे दिवंगत भाऊ सुरेश परसवानी यांचे कुटुंबही वास्तव्यास आहे. चोवीस **(पान ४ वर)**

# सुन रहे हो न विनोद..,आपलं लक्ष्य साधेसुधे नसते पुतळा बनवला तो जगात सर्वात मोठा; नरेंद्र मोदी

**मुंबई, दि. ५ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या भाषणांमधून विरोधकांवर निशाणा साधण्यासाठी तसेच सरकारचे काम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नेहमीच वेगवेगळ्या आणि अनोख्या शैलीचा वापर करतात. असाच काहीसा प्रकार शनिवारी गुजरातमध्ये पाहायला मिळाला. गुजरातच्या साणंद येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदींनी थेट पंचायत या लोकप्रिय वेब सीरिजमधील सुन रहे हो न, विनोद..,या डायलॉगचा वापर केला आणि उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.**

साणंद येथे सीजी सेमी आऊटसोर्स्ड सेमीकंडक्टर




असेंब्ली अँड टेस्ट, या अत्याधुनिक सुविधेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर उपस्थित असलेल्या सीजी पॉवर अँड इंडस्ट्रीयल सोल्यूशन्सचे चेअरमन वेल्लायन सुबैया यांनी आपल्या भाषणात दोन गुजराती म्हणींचा वापर केला होता. त्याचाच धागा पकडत पंतप्रधान मोदींनी आपल्या खास शैलीत हा संवाद फेकला, ज्याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

**लक्ष्य कधीही छोटे नाही**

या कार्यक्रमात बोलताना उद्योजक वेल्लायन सुबैया म्हणाले होते की, सरकारची विकासाची दृष्टी अत्यंत स्पष्ट आहे, आता उद्योग जगताने त्या दिशेने पुढे जाण्याची गरज आहे. लक्ष्य चुकणे माफ केले जाऊ शकते, पण लहान लक्ष्य ठेवणे कधीही माफ केले जाऊ शकत नाही. सुबैया यांच्या या विधानाचा उल्लेख करत पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात सांगितलं की, मी कधीही छोटे लक्ष्य ठेवत नाही आणि छोटी विचारसरणीही ठेवत नाही. मी पुतळा बनवला तो देखील जगातील सर्वात मोठा.

# नंदुरबार जिल्हा केळी बोर्डाच्या स्थापनेसाठी शहाद्यात आ.राजेश पाडवी व कलेक्टर डॉ.मिताली सेठींची बैठक

**शहादा,दि.०५(का.प्र.) - नंदुरबार जिल्ह्यात स्वतंत्र केळी बोर्डाची स्थापना व्हावी, या अत्यंत महत्त्वाच्या मागणीसाठी शहादा तहसील कार्यालयात आमदार राजेश पाडवी व जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक बैठक पार पडली. या बैठकीमुळे जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या केळी बोर्डाच्या स्थापनेसाठी आता एक पाऊल पुढे पडले आहे.**



गत २६ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या सूचनेनुसार केळी बोर्डाच्या संदर्भात एक बैठक झाली होती. त्याच बैठकीचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणून शहाद्यातील या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सहाय्यक जिल्हाधिकारी दीपक गिरासे, तहसीलदार संभाजी पाटील, ज्येष्ठ नेते दीपकभाई पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती **(पान ४ वर)**

## संशयास्पद फिरणाऱ्या तरुणास धुळ्यात अटक

धुळे, दि.५ - शहरातील पांझरा नदी किनारी अग्रवाल भवन जवळील परिसरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या तरुणास शहर पोलिसांनी अटक केली. सलमान युसुफ पठाण (वय २७, रा. मोगलाई साक्री रोड धुळे) असे त्याचे नाव आहे. शनिवारी (ता.४) पहाटे पूर्वी दोनच्या सुमारास तो संशयास्पद रीतीने तोंडाला रुमाल बांधून फिरत होता. गंभीर गुन्हा करण्याचा त्याचा उद्देश असल्याचा पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. कानातील नथ सह इतर धातूचे साहित्य त्याच्याकडून ताब्यात घेतले. हवालदार एस. यु. मोरेंच्या फिर्यादीनुसार सलमान पठाण विरुद्ध गुन्हा दाखल झाला.

# मुंबईत वादळाने अडीचशे झाडे पडली दोघांचा मृत्यू, पुन्हा ऑरेंज अलर्टचा इशारा

**मुंबई, दि. ५ : मान्सूनच्या पहिल्या जोरदार पावसाने शहराला झोडपून काढले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहितीनुसार, आज सकाळी आठ ते दुपारी एक दरम्यान सरासरी २२.७९ मिमी पावसाची नोंद झाली. पूर्व उपनगरात ३८.६९ मिमी आणि पश्चिम उपनगरात ३६.९९ मिमी पावसाचा समावेश आहे. या काळात सोसाट्याच्या वाऱ्याने शहरात हाहाकार माजवला. वादळामुळे मुंबईत सुमारे एक तास विमानसेवा ठप्प झाली होती.**



**पावसामुळे उद्या(दि.६) ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आला आहे.**

सी आणि डी वॉर्डमध्ये वाऱ्याचा वेग ताशी ७२.४ किमी, घाटकोपरमध्ये ताशी ७५ किमी आणि वांद्रे पश्चिममध्ये ताशी ७७ किमी होता. या वाऱ्यामुळे २५० हून अधिक झाडे उन्मळून पडली आहेत. तर कुर्ला आणि आरे येथे दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यात दोन तरुणांचा मृत्यू झाला. कुर्ला (कमणी) येथील गोम्स टाऊन इमारतीजवळ एका दुकानावर झाड पडल्याने ६३ वर्षीय युनूस कुंडावाला यांचा मृत्यू झाला. दरम्यान, आरे कॉलनीतील युनिट नं. १३ रस्त्यावर झाडाची फांदी १८ वर्षीय कुमार हसनरझा जहांगीर आलम सय्यद याच्या डोक्यावर पडली. दोघांनाही रुग्णालयात नेण्यात आले. **(पान ४ वर)**

## बारा दिवसात एक हजार मिमी पाऊस

मुंबई : शनिवारी मुंबई परिसरात मुसळधार पावसाचा जोर कायम राहिला. शहरात जुलै महिन्यातील सरासरी पावसापैकी जवळपास ऐंशी टक्के पाऊस अवघ्या चार दिवसांतच पडला आहे. एक जुलैपासून आतापर्यंत हवामान विभागाच्या सांताक्रूझ वेधशाळेने ६७५.६ मिमी, तर कुलाबा वेधशाळेने ५०० मिमी पावसाची नोंद केली आहे. यामुळे मान्सूनच्या आगमनानंतर अवघ्या बारा दिवसांतच शहरातील एकूण पावसाने एक हजार मिमीचा टप्पा ओलांडला आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे आणि पालघरसाठी रविवारी रेड अलर्ट कायम ठेवत सोमवारसाठी ऑरेंज ॲलर्ट जारी केला आहे.

## डॉ. विनोद श्रीवास्तवांचा जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञांच्या गटात समावेश

नंदुरबार, दि.५ - येथील



जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार महाविद्यालयातील माजी.प्राचार्य डॉ. विनोद. एस. श्रीवास्तव यांचे जागतिक स्तरावर ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये रसायनशास्त्र गटात नांव समाविष्ट करण्यात आले आहे.

प्राचार्य डॉ. व्ही.एस. श्रीवास्तव यांचे रसायनशास्त्र गटात प्रतिष्ठित मग्लोबल सायंटिस्ट इंडेक्स-२०२५ मध्ये नोंद झाली असून, त्यांना जगातील अव्वल पाच टक्के वैज्ञानिकांमध्ये स्थान मिळाले आहे. संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय **(पान ४ वर)**

# गोतस्करीच्या वादातून मध्यरात्री हाणामारीची घटना अफवांवर विश्वास ठेवू नका- पोलिस अधिक्षक

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- जिल्हयात गोवंश तस्करीवरुन हाणामारीची घटना घडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.तस्करीवरुन गाडीवर दगडफेक,जमावावर गाडी घालण्याचा प्रकारही घडला.या प्रकरणी चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अकराहून अधिक आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून जिल्हा पोलिस अधिक्षक आश्वीनी सामंत यांनी प्रकरण अंत्यंत सावधगिरीने हाताळत होणारी दंगल टाळली.**

विसरवाडी हून नंदुरबारकडे गावंशाची तस्करी करणारे वाहन येत असल्याची माहिती शनिवारी रात्री पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता तीन गोवंश गाडीत आढळून आले.पोलिसांची कारवाई सुरु असतांनाच गोरक्षक व मुस्लीम युवक शिवण नदीजवळ समोरासमोर आले.यात दोन गटात हाणामारी होवून दोन युवक जखमी झाले.गोरक्षकाची गाडी साक्री नाक्यावर येताच गाडीवर दगडफेक करण्यात आली.



तसेच गाडी फोडण्यात आली.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.दोन्ही गटात शांतता प्रस्थापित करण्यात पोलिसांना यश मिळाले.अशातच कसाई मोहल्ल्यात एकाची गाडी जमावाला धडकली.चालकाने पळ काढण्याचा प्रयतक.केला.या घटनेत तीन जण जखमी झाले आहेत.तसेच चार किरकोळ जखमींना उपचारानंतर सोडण्यात आले. या प्रकरणी गोवंश तस्करी, शिवण **(पान ४ वर)**

## मुंबईच्या व्यावसायिकास निजामपूरजवळ लुटले

धुळे, दि.५ - व्यवसायाच्या उद्देशाने सिंदबनगाव (ता.साक्री) येथे आलेल्या दोन जणांना आठ ते दहा जणांनी निर्जास्थळी गाठून त्यांची लूट केल्याची घटना घडली. याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस तपास करीत असून लवकरच मारेकरी हाती लागण्याची शक्यता आहे.

व्यावसायिक वरुण रामकुमार वाधवानी (वय ३३, रा. सेठ हाईटस, चेंबुर मुंबई) यांचा लोखंडी अन्य धातूचे माल खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. निजामपूर शिवारात स्वस्तात ॲल्युमिनियमच्या जुन्या वस्तू मिळणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. काही जणांसोबत व्यावसायिक **(पान ४ वर)**




# टँकर-कन्टेनरचा भीषण अपघात टँकर पेटला, चालक होरपळला

**धुळे, दि. ५ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय महामार्गावरील सबगव्हाण तोलनाक्याजवळ शनिवारी रात्री आठच्या सुमारास रसायनांनी भरलेल्या एका टँकरची समोरच्या कंटेनरला जोरदार धडक बसली. ही धडक इतकी भीषण होती की, धडकेनंतर टँकरला अचानक आग लागली. त्यात संपूर्ण टँकर जळून खाक झाला. या दुर्दैवी घटनेत टँकरचा चालक केबिनमध्ये होरपळून जागेवरच मरण पावला.**

पोलिस आणि घटना स्थळाजवळ असलेल्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातहून ओडीसाकडे निघालेला जी. जे. अठरा, बी. व्ही.-आठ हजार तीनशे पंचानव्ह क्रमांकाचा टँकर धुळ्याहून पारोळ्याकडे जात होता. या टँकरमध्ये टोल्यूनडाय आयसोसायनेट नावाचे तब्बल दहा हजार लीटर अतिज्वलनशील रसायन भरलेले होते. सबगव्हाण टोलनाक्याजवळ या टँकरने समोरच्या कंटेनरला मागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे टँकरचे टायर फुटले आणि क्षणात आगीचा मोठा भडका उडाला. विशेष म्हणजे, यावेळी पाऊस सुरू असतानाही आगीची तीव्रता इतकी भीषण होती की काही वेळातच संपूर्ण टँकर आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. टँकरमध्ये अति ज्वलनशील रसायन असल्याने आग वेगाने पसरली. त्यात केबिनमध्ये बसलेल्या चालकाला **(पान ४ वर)**

# पद्मविभूषण गायिका डॉ. तीजनबाईनी सत्तराव्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

मुंबई, दि. ५ : पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या आणि छत्तीसगडच्या प्रसिद्ध लोककला पंडवानी गायन जागतिकस्तरावर पोहचवणाऱ्या ज्येष्ठ लोकगायिका डॉ. तीजनबाई यांचे निधन झाले. वयाच्या ७० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. तीजनबाई यांनी रायपूर येथील एम्स रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्या दीर्घ आजाराने त्रस्त होत्या. त्यांच्या निधनामुळे भारतीय लोककला जगतावर शोककळा पसरली आहे. तीजनबाई यांनी लोककलेला जागतिकस्तरावर ओळख मिळवून दिली होती. त्यांना आपल्या कारकिर्दीसाठी पद्मविभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. तीजनबाईंनी महाभारतातील कथा रंगमंचावर सादर करुन भारतीय लोककला विश्वात ओळख निर्माण केली होती.



तीजनबाई यांचे लोककला विश्वात मोठे कार्य होते. आपल्या कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यापुर्वी १९८८ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर १९९५ त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर २००३ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. तर २००३ मध्ये त्यांना बिलासपूर विद्यापीठाने डॉक्टरेट पदवीने सन्मानीत करण्यात आले होते. तसेच २०१६ मध्ये त्यांना एम. एस. सुब्बालक्ष्मी शताब्दी अवॉर्ड मिळाला. सरकारने २०१९ मध्ये त्यांचा पद्म विभूषणने सन्मान केला. तीजनबाईंचा जन्म भिलाई गावातील गनियारी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हुनुकलाल परधा आणि आईचे नाव सुखवती होते. तीजनबाई यांच्या व्यक्तीगत जीवनाबाबत माहिती घेतल्यास, वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे लग्न झाले होते. त्यांना आपल्या आयुष्यात मोठ्या संघर्षाचा सामना करावा लागला. पण तीजनबाई यांनी कधीही हार मानली नाही. तीजनबाई यांनी केवळ देशातच नाही तर, **(पान ४ वर)**

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,34,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,46,500 रु.+3% GST
चांदी- 2,39,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## मुकटी येथील एकाची आत्महत्या

**धुळे, दि.५ - मुकटी (ता. धुळे) येथील प्रौढाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली. बळीराम ताराचंद पाटील (वय ५१) असे त्यांचे नाव आहे.**

आज सकाळी पावणे आठच्या सुमारास घरी विषारी औषध प्राशन केले. त्यांना धुळ्यातील सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले आले. त्यावेळी डॉ. रोहन कुलकर्णी यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. धुळे तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. तालुका पोलिस ठाण्यात ही नोंद करुन हवालदार सोनवणे तपास करीत आहेत.



# प्रकाश वाटा उपक्रमाला नवी ऊर्जा जिल्हाधिकाऱ्यांचा विद्यार्थ्यांनसोबत संवाद

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- जिल्हा नियोजन समिती व आदिवासी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या प्रकाश वाटा या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत १०० आदिवासी विद्यार्थी व १०० विद्यार्थिनींना नीट व जेईई परीक्षांसाठी संपूर्ण वर्षभर मोफत निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी शासकीय इंग्रजी माध्यम आश्रम शाळा नंदुरबार, शासकीय उच्च माध्यमिक आश्रम शाळा कोठली आणि पीएमश्री शासकीय आश्रम शाळा ढोंगसगळी येथे अत्याधुनिक अभ्यास केंद्रे निश्चित करण्यात आली असून, आदिवासी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

दि. ०४ जुलै २०२६ रोजी डॉ. मिताली सेठी यांनी या अभ्यास केंद्रांना भेट देऊन निवास व्यवस्था, शैक्षणिक सुविधा, अभ्यासाचे वातावरण व विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेल्या सर्व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांच्यासोबत डॉ. चंद्रकांत पवार हे सातत्याने उपस्थित राहून संपूर्ण उपक्रमाची **(पान ४ वर)**




# हस्ती ग्रुप स्कूल तर्फे ग्राफिक डिझाईन आणि नाट्यकला विषयावर मार्गदर्शन

**दोंडाईचा वि. प्र.- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथील विद्यार्थ्यांकरिता ग्राफिक डिझाईन व नाट्यकला क्षेत्रातील संधी या विषयावर एक्सप्लोरर प्रोग्राम - करिअर मार्गदर्शन व समुपदेशन सत्रचे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी आयोजन करण्यात आले.**

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच ग्राफिक डिझायनिंग आणि मनोरंजन क्षेत्रातील नाट्यकलेचे महत्व लक्षात घेता त्याच्या संधी लक्षात घेता हे सत्र आयोजित केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी विरेंद्र पाटील नाट्यकलावंत, लेखक, दिग्दर्शक व क्रेझी क्रिएशनचे संचालक हे स्रोत व्यक्ती उपस्थित होते. यावेळी हस्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रझिया दाऊदी, हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जिवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर आदी उपस्थित होते.

हस्ती पब्लिक स्कूलचे इ. ९ वी तर हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल चे इ. ८ वी व ९ वीचे विद्यार्थ्यांकरिता या सत्राचे आयोजन करण्यात आले. यांत ग्राफिक **(पान ४ वर)**

## कंटेनरच्या धडकेत बाभळ्यात मजूर ठार

**धुळे, दि.५ - मुंबई- आग्रा महामार्गावरील बाभळे (ता. शिंदखेडा) शिवारात कंटेनर ने दिलेल्या धडकेत महामार्गावरील साईट पट्ट्याचे काम करणारा मजूर ठार झाला.**

याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध शिंदखेडा पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल झाला. योगेश वसंत पवार (वय २४, रा. खापरखेडा ता. अमळनेर) असे मृताचे नाव आहे. एक जुलैस सकाळी अन्य मजुरांसोबत बाभळे फाट्यावर महामार्गावर साईट पट्ट्यांचे काम तो करीत होता. मागून येणाऱ्या कंटेनरने (एचआर ५५/एटी ४३६३) धडक दिली, त्यात गंभीर दुखापत झाल्याने योगेशचा मृत्यू झाला.

<u>नंदुरबारमध्ये सीए दिन साजरा</u>

# पंधरा नवोदित चार्टर्ड अकाउंटंट शेचाळीस गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- नंदुरबार सी.पी.ई. चॅप्टर (नंदुरबार सीए असोसिएशन) यांच्या वतीने राष्ट्रीय चार्टर्ड अकाउंटंट दिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभात सीए परीक्षेत मागील २ वर्षांत यश मिळवलेल्या ४६ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये पूर्ण सीए पदवी संपादन करणाऱ्या १५ विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीए कृष्णा गांधी होते. यावेळी सीए शुभम अग्रवाल, सीए के. एस. शर्मा, डॉ. शिरीष शिंदे आणि डॉ. राजेश वसावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविकात सीए कृष्णा गांधी यांनी नंदुरबार सी.पी.ई. चॅप्टरच्या कार्याचा आढावा घेत, पासून स्वतंत्र चॅप्टरच्या माध्यमातून जिल्ह्यात सीए क्षेत्राच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच नंदुरबार येथे सीए परीक्षा केंद्र उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठी सुविधा मिळाल्याचे सांगितले. **(पान ४ वर)**

**उठावणा**



बड़े दुःख के साथ आपको सूचित किया जाता है कि, पंकज, राहुल एवं अभिजीत इनके पिताजी, तथा डॉ.श्रीराम भतवाल इनके बड़े भाई
**स्व.गोपाल रामेश्वर भतवाल**
इनका दुःखद निधन दि. ४/७/२०२६, शनिवार को हो गया है।
उनका **उठावणा** सोमवार दिनांक ०६/०७/२०२६ को समय दोपहर ४:०० बजे अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे, धुलिया यहापर है.
**-: शोकाकुल :-**
**डॉ.श्रीराम, राजेश, संजय, अजय, आलोक, निरंजन, पंकज, राहुल, अभिजीत, डॉ.आदित्य**
**एवं समस्त भतवाल परिवार**
-: फर्म :-
मॉडर्न अप्लायंसेस   मॉडर्न ग्रीनटेक सोल्यूशन
भतवाल फिनवेस्ट, धुलीया

आपला महाराष्ट्र

# आणखी एक फाशीची शिक्षा:पुढे काय?

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर या गावात साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या आरोपीस विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा ठोठावली. ज्याला ही शिक्षा ठोठावली तो पासष्ट वर्षांचा आरोपी आहे. एका बाजुला देशात आणि राज्यात लाखो खटले प्रलंबित असताना नसरापूर अत्याचाराच्या खटल्यात अवघ्या ५५ दिवसांत न्यायालयाने निकाल दिला. पोलिसांनी कामात व तपासात तत्परता दाखवून काही दिवसांतच बाराशे पानी चार्जशीट तयार करून न्यायालयास सादर केले. शिवाय साक्षीपुरावे सादर केले त्यामुळे न्यायालयास खटला चालविण्यास सोपे गेले. म्हणूनच न्यायालय शिक्षा देण्यापर्यंत पोहचले. एवढ्या सगळ्या यंत्रणा सजग होत्या. राज्यातील न्यायालयीन इतिहासात दोन महिन्यांच्या आत सुनावणी होऊन निकाल लागलेला हा पहिला खटला ठरला आहे. निरनिराळ्या कलमान्वये पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदविला होता. न्यायाधिशांनी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली तेव्हा त्या पालिकेचे आई वडील उपस्थित होते. त्यांना निकाल ऐकून अश्रू अनावर झाले होते. खटल्याची सुनावणी इनकॅमेरा झाली कारण प्रकरण संवेदनशील होते. सरकार पक्षाने डीएनए अहवाल, न्याय वैद्यकीय पुरावे आणि साक्षिदारांचे जबाब यावरून आरोपींचा गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने नमुद केले. सदर आरोपीने या पूर्वी दोन महिलांवर अत्याचार केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. या निकालानंतर पीडित बालिकेच्या आई वडील व नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले. अशा गुन्ह्यात आरोपीला अशीच शिक्षा योग्य असल्याचे त्यांचें म्हणणें पडले. ते स्वाभाविकच म्हणावे लागेल. समाजात न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे एक चांगला संदेश गेला अशीही प्रतिक्रिया उमटली आहे.ती देखील योग्यच म्हणावी लागेल.मात्र मुद्दा तेवढाच नसून एका प्रकरणाचा समाधानकारक निकाल मिळाला. त्यानंतर पुढे काय या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी येते कारण एका प्रकरणात शिक्षा मिळाल्यानंतर पुढच्यास ठोकर मागचा शहाणा असे होत नाही. अत्याचार. बलात्कार,खून हे प्रकार थांबलेले नाहीत. तसे झाले असते तर हा समाज निर्धास्त झाला असता.

कोपर्डी प्रकरणानंतर मराठा समाजाचे लाखोंच्या संख्येने मूक मोर्चे निघाले होते तरूण मुलींची प्रभावी भाषणे ठिकठिकाणी झाली होती. कोणत्याही राजकीय नेत्यांची उपस्थिती यात नव्हती म्हणजे कुठल्याच राजकीय नेत्यांच्या नेतृत्वाखाली हे मोर्चे निघालेले नव्हते. सरकार व सरकारच्या सर्व यंत्रणांनी त्याची दखल घेतली होती. त्यामुळे अत्याचाराचा मनसुबा असणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक गायब होतील आणि अत्याचार करण्यास धजावणार नाहीत असा लोकांचा कयास होता पण तसे काही घडले नाही. राज्यातील महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढच झालेली दिसते. नोंद झालेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. सर्वाधिक गुन्हे कौटुंबिक हिंसाचाराचे, विनयभंगाचे बलात्कार व अपहरणाचे आहेत.या मुळे महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे.राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारी नुसार राज्यात एका वर्षात अठ्ठेचाळीस हजार प्रकरणांची नोंद झालेली आहे. त्यात मुंबई आणि पुणे शहर आघाडीवर आहेत. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी स्वतंत्र विभाग कार्यरत असून राज्यभर भरोसा

सेल कार्यरत आहेत. फास्ट ट्रॅक कोर्ट आहेत, त्यांची संख्याही पन्नासहून अधिक आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्य महिला आयोग आहे. ही सर्व व्यवस्था गुन्हा घडल्यानंतरची आहे. गुन्हा घडत असताना कोणीही काहीही करू शकत नाही. प्रत्येक माणसामागे यंत्रणा उभी राहू शकणार नाही. शेवटी हा प्रवृत्तीचा किंवा मानसिकतेचा मुद्दा आहे. त्यावर नियंत्रण आणणारी यंत्रणा निर्माण होऊ शकणार नाही. त्या परिस्थितीचा गैरफायदा गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना सहज घेता येतो.म्हणूनच देशातील एकोणीस महानगरात एकूण ५० हजारांहून अधिक महिला अत्याचारांचे गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

दोन वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील बोपदेव घाटात मित्रांसोबत फिरायला गेलेल्या एका तरूणीवर सामूहिक बलात्कार झाला होता, गेल्या वर्षी स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या बसमध्ये अशीच घटना घडली होती. तेव्हा सुरक्षा यंत्रणा टीकेची धनी झाली होती. मुद्दा असा की,घटना कितीही जबर शिक्षा झाली तरी थांबलेल्या नाहीत. दिल्लीत धावत्या बस मध्ये तरूणीवर झालेला बलात्कार सर्वश्रुत आहे. त्या तरूणी सोबत असलेला तरूण काहीच करू शकला नाही. तिचे आयुष्य क्षणार्धात उध्वस्त झाले.त्या प्रकरणाचा धागा धरून राजकीय रणकंदन माजले होते. पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या सरकारला लक्ष्य करण्यात आले होते. दिल्लीच्या रस्त्यावर हजारो तरूण तरूणी मेणबत्या पेटवून उतरल्या होत्या.रात्री पर्यंत संसद चालू होती. विरोधकांनी सरकारला धारेवर धरले होते. बलात्कारींना फाशीची शिक्षाच झाली पाहिजे अशा मांडणीतून कायदा झाला. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर जरब बसेल अशी अटकळ होती परंतु कायदा झाल्यानंतरच्या काळातील गुन्ह्यांचे प्रमाण कमी न होता वाढलेले दिसते याचा अर्थ फाशीच्या शिक्षेच्या कायद्याची कुणालाच भीती वाटत नाही. परिणामी गुन्हेगार मस्तावले आहेत. उच्चभ्रू गुन्हेगार खटपटी लटपटी करून संशयाचा फायदा घेऊन सुटतात. ज्यांचा कोणीच वाली नाही त्यांना शिक्षा होतात अशीही काही उदाहरणे घडलेली आहेत. महिलांच्या विषयी मनात असलेली अनेकांची भावना दुषित असते.तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणूनच बघितले जाते. ती भावना वाढीस लागण्याचे प्रमाण मोठे असून आधुनिक संचार माध्यमांचा वापर अशी परिस्थिती निर्माण करण्यास अधिक कारणीभूत आहे. इंटरनेटवर, समाज माध्यमांवर, युट्यूब व गुगल सारख्या माध्यमांवर तरुण तरूणींच्या भावना चाळवतील अशी असंख्य साधने उपलब्ध आहेत. प्रत्येकाकडे अनरॉईड मोबाईल आहे. बरेच आई वडील मुलांची त्या संबंधीची मागणी सहजपणे पूर्ण करून देतात.आपली मुले ती साधने हाताळताना नेमके काय करतात याबाबत ते अनभिज्ञ असतात. वेळ थांबत नाही ती पुढेच जात असते. त्यानुसार मुलेही पुढे गेलेली असतात आणि आकर्षणात अडकतात त्यातून मैत्रीतून एकरुप होतात. विवाहबंधनात अडकवून घेतात. पण बरेचसे जबरदस्ती करतात तो गुन्हा ठरतो. या संदर्भातील जबाबदारी सरकारची नाही तर ती पालकांचीच आहे. त्यांचेच नेमके लक्ष नसते. म्हणून गुन्हे घडत जातात.सरकारची जबाबदारी उत्तम संस्कारी व रोजगाराभिमुख शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याची आहे पण त्याबाबत सरकार आणि पूरक यंत्रणांसह बुद्धिवादी विचार करीत नाहीत. त्यांच्या दृष्टिने क्रिम वर्ग तयार करणे म्हणजे शिक्षण होय. मनी ओरिएंटेड एज्युकेशन सिस्टीम मध्ये संस्कार कुठेच नाही. जीवन शिक्षण नाही. म्हणूनही प्रश्न निर्माण झालेले आहेत. जर जीवनाचे शिक्षण नव्या पिढीला दिले, संविधानातील तरतुदीनुसार दिले.स्त्रीपुरूष समानता, सहजीवन, धर्म निरपेक्षता, जात पंथ विरहीत तत्त्वांचे पालन करणारे शिक्षण दिले, तसा आराखडा तयार केला तर निश्चितपणे निकोप समाज निर्माण होऊ शकतो फक्त ईच्छा शक्ती तेवढी हवी. ती नसल्यामुळे एकाला एका गुन्ह्यात शिक्षा झाली पुढे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

# हुकूमाचा एक्का नि भाऊचा धक्का

उबाठा सेनेच्या लोकसभेतील सहा खासदारांनी मातोश्रीला जय महाराष्ट्र केला आणि थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सहा खासदारांच्या पक्षांतराने कमालीचे अस्वस्थ झाले. फुटीर खासदारांच्या हिंगोली, परभणी, धाराशिव, शिर्डी, इशान्य मुंबई मतदारसंघात जाऊन त्यांनी सभा घेतल्या. फुटीरांची बेईमान व गद्दार म्हणून संभावना केली. त्याच वेळी मुंबईत सुरू झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उबाठा सेनेचे विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी ठाकरेंना जय महाराष्ट्र केला आणि त्यांनाही एकनाथ शिंदेंनी लाल गालिचा अंथरला. एवढेच नव्हे तर चोवीस तासात शिंदे यांनी विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी त्यांची उमेदवारी जाहीर केली आणि दुसऱ्याच दिवशी मंत्रीपदाचा दर्जा असलेल्या उपसभापतीपदावर सचिन अहिर यांची बिनविरोध निवड झाली. जे जे होत आहे, ते बघत राहायचे एवढेच उबाठा सेनेच्या हाती उरले आहे. पक्ष सोडून जाणाऱ्या आमदार खासदारांना अडवता येत नाही आणि त्यांच्या विरोधात आदळ आपट करून काही साध्यही होत नाही.

सध्या उबाठा सेनेला साडेसातीने ग्रासले आहे. पक्षातील एकेक बिनिचे शिलेदार मतदारसंघाच्या विकासाचे कारण सांगून महायुतीत सामील होत आहेत. जे भाजपाला अपेक्षित आहे, तेच ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून शिंदे करीत आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना २०२२ मधे शिंदेंच्या नेतृत्वाखाली ठाकरे यांच्या पक्षातून दिवसाढवळ्या ४० आमदार बाहेर पडले. दहा अपक्षांसह पन्नास आमदारांनी बरोबर घेऊन शिंदेंनी ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला. तेव्हा सुरत, गुवाहटी, गोवा असा भन्नाट प्रवास झाला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, देवेंद्र फडणवीस आणि भाजपाची सर्व ताकद शिंदेंच्या पाठिशी भक्कमपणे उभी होती. त्यावेळी पक्ष फोडला म्हणून शहा- फडणवीस व भाजपाकडे बोट दाखवले गेले. २०२६ मधे सहा खासदार फुटले व आमदार सचिन अहिर बाहेर पडले तेव्हा नायक व खलनायक हे दोन्हीही एकनाथ शिंदेच ठरले. सर्व रणनिती शिंदे यांची होती. ठाकरे सेनेतून बाहेर पडलेले खासदार किंवा सचिन अहिर हे कोणी भाजपामधे गेले नाहीत तर भाजपाचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेत गेले. ठाकरे यांचा पक्ष फुटल्याने भाजपाला आनंद होणे स्वाभाविक आहेच पण शिवसेनचे संख्याबळ वाढले म्हणून शिंदेंचेही एनडीएमधे महत्व वाढत चालले आहे.

एकनाथ शिंदे यांना सार्वजनिक जीवनात भाई म्हणून ओळखतात. आता त्यांच्या जोडीला भाऊ म्हणून ओळखले जाणारे सचिन अहिर पक्षात आले आहेत. भाई व भाऊ दोघांच्या पाठिशी कार्यकर्त्यांची मोठी फौज आहे. दोघांनाही मोठा जनाधार आहे. सचिनभाऊ शिंदेंच्या पक्षात आले म्हणून उबाठाला वरळीत त्रास होऊ शकतो. सचिन अहिर हे केवळ आमदार नाहीत. ते आदित्य ठाकरे यांच्या विश्वासातील होते. वरळी- शिवडी भागात सचिनभाऊंचा प्रभाव आहे. कामगार क्षेत्रात त्यांचे काम आहे. माजी आमदार व गुन्हेगारी क्षेत्रातील एकेकाळचे नामचिन अरूण गवळी यांचे ते भाचे आहेत. खासदारांच्या फुटीनंतर विधानसभेतील उबाठा सेनेचे आमदार फुटणार अशी चर्चा होती पण विधान परिषदेतील सचिन अहिर हे उडी मारतील, याची कोणाला कल्पना नव्हती. सचिन अहिर हे अगोदर शरद पवारांच्या अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसमधे होते. मुंबईचे अध्यक्ष होते. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. राज्यमंत्रीही होते. गिरणी कामगारांच्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे ते प्रमुख होते.

वरळी मतदारसंघाचे आमदार म्हणून आदित्य ठाकरे हे विधानसभेत प्रतिनिधीत्व करतात. उद्धव ठाकरे यांच्या महाआघाडी सरकारमधे आदित्य कबिनेटमंत्री होते. वरळी हा मतदारसंघ शिवसेनेचे दत्ताजी नलावडे व सुनिल शिंदे यांनी जोपासला. सुनिल शिंदे दोन वेळा तेथून आमदार झाले. ते वरळीत शिवसेनेचे १८ वर्षे शाखाप्रमुख होते. ५ वर्षे नगरसेवक होते. सचिन अहिर यांचा पराभव करून विधानसभेवर आमदार झाले. सचिन अहिर हे राष्ट्रवादी काँग्रेस सोडून ठाकरेंच्या शिवसेनेत आले. आदित्य यांना सुरक्षित मतदारसंघ मिळावा म्हणून पक्षाने सुनिल शिंदे व सचिन अहिर या दोघांनाही विधान परिषेदवर आमदार म्हणून पाठवले. वरळी या एकाच मतदारसंघात एकाच वेळी आदित्य ठाकरे, सचिन अहिर व सुनिल शिंदे असे तीन आमदार आहेत. आदित्य ठाकरे २०१९ व २०२४ असे दोन वेळा वरळीतून निवडून आले. सचिन अहिर यांचे ऑपरेशन टायगर एकनाथ शिंदे यांनी पार पाडले. पण त्यांनी जेव्हा उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला तेव्हा शिंदे यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते. ईशान्य मुंबईतून निवडून आलेले खासदार संजय दिना पाटील हे सचिव अहिर यांचे निकटचे मित्र. दोघेही राष्ट्रवादी काँग्रेसमधून ठाकरेंच्या शिवसेनेत आले. संजय पाटील हे खासदार झाले तर सचिन हे आमदार झाले. सहा खासदारांच्यासोबत संजय दिना पाटील हे शिंदेंच्या शिवसेनेत गेले. त्या पाठोपाठ सचिन अहिर शिवसेनेत दाखल झाले. त्यांना ठाकरेंकडून शिंदेंकडे आणण्यात संजय दिना पाटील यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**डॉ.सुकृत खांडेकर**
**स्टेटलाइन**

सचिन अहिर ठाकरे सेना सोडून गेले, त्याचा फटका आदित्य ठाकरेंना आगामी विधानसभा निवडणुकीत बसू शकतो.कालपर्यंत आमच्या पाया पडणारे आज दुसऱ्याच्या मांडीला मांडी लावून बसलेत, अशी कडवट प्रतिक्रिया आदित्य यांनी दिली.

खासदार संजय राऊत यांनी सचिनभाऊंना पक्षाने काय काय दिले याचा पाढाच वाचला. संताप व्यक्त करताना ते म्हणाले, ठाकरे कुटुंबाने व शिवसैनिकांनी त्यांच्यावर जीवापाड प्रेम केले. त्यांनाच अंधारात ठेऊन ते झोपेत असताना त्यांच्या डोक्यात दगड टाकून हा माणूस निघून गेला जो माणूस त्यांचे राजकीय गुरू शरद पवार यांचा होऊ शकला नाही, तो आमचा कसा होणार ?

सचिन अहिर २०१९ मधे ठाकरे सेनेत आल्यानंतर पक्षाने त्यांना २०२० मधे उपनेतेपद दिले. २०२२ मधे विधान परिषदेवर आमदार केले. भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस दिले. बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्षपद दिले. पुणे जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारी दिली. आदित्य ठाकरे तर त्यांना नियमित भेटत होते, मग असे काय झाले की त्यांनी अचानक एकनाथ शिंदेंच्या तंबूत प्रवेश केला ? त्याचे उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. ते म्हणतात - प्रत्येक जण आपले भविष्य पाहतो. पक्षाचे नेतृत्व आत्मविश्वास देणे बंद करते, तेव्हा लोक जिथे भविष्य सुरक्षित आहे तिथे जातात. आम्ही अडिच वर्षे विरोधात असताना आम्हाला एक रूपया सुध्दा निधी मिळाला नाही, पण आमचा एकही आमदार फुटला नाही.

माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे की, ऑपरेशन टायगर नव्हे तर ऑपरेशन देवेंद्र आहे, असे कोणी म्हटले तरी एकनाथ शिंदेंचे महत्व कमी होणार नाही. जो नेता ५० आमदार बरोबर घेऊन बाहेर पडतो, त्याची ताकद काय असेल हे उद्धव ठाकरेंना कळले नाही का ? सत्तेसाठी काही पण ही त्यांचीच शिकवणूक आहे

सचिन अहिर यांनी मात्र वरळी मतदारसंघ ही कोणाची इस्टेट नाही अशी प्रतिक्रिया दिली आहे. आपण पक्ष सोडलेला नाही. मी शिवसेना पक्षाचा आमदार म्हणून निवडून आले. मी धनुष्य बाण हे अधिकृत चिन्ह असलेल्या पक्षातूनच मी उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. एकनाथ शिंदे जी जबाबदारी देतील ती मी ताकदीने पार पाडीन.

एकनाथ शिंदे यांनी सचिन अहिर यांना राजकारणातले मास्टर ब्लास्टर असे संबोधले आहे. सचिन यांच्यापाठोपाठ लवकरच क्रिकेटची टीम शिवसेनेत येईल असे भाकीत आमदार बच्चू कडू यांनी वर्तवले आहे. ऑपरेशन टायगर चालूच आहे.



# मुक्तांगण शैक्षणिकचे शेहेचाळीस विद्यार्थी शिष्य.परीक्षा गुणवत्ता यादीत

**धुळे, दि.४(प्रतिनिधी)- बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण शैक्षणिक प्रांगणचे, तब्बल शेहेचाळीस विद्यार्थ्यी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकले. मुक्तांगण संकुलच्या या गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल नुकताच घोषीत झाला. यात मुक्तांगण इंग्लिश मीडियम मधील इयत्ता ५ वी चे ३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यात सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर १४ विद्यार्थी गुणवत्ता यादी झळकले. तसेच इयत्ता ८ वी चे २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले यात ७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. मुक्तागण सेमी इंग्लिश मेडीयम चे इ. ५ वी चे ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले व यातील २० विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. इयत्ता ८ वी चे ४७ विद्यार्थ्यी उत्तीर्ण झाले व यात ५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. मुक्तांगण शैक्षणिक संकुलच्या तब्बल ४६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन बाळासाहेब भदाणे, सचिव शालिनीताई भदाणे, प्राचार्य व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# आमिर-गौरीची साता जन्माची गाठ घरच्या घरीच तिसऱ्यांदा लग्न बेडीत

**मुंबई, दि. ५ : बॉलिवूडचा परफेक्शनिस्ट आमिर खान याने तिसऱ्यांदा लग्न केले आहे. आमिर खान आणि गौरी स्प्रॅट यांचे अधिकृतरित्या लग्न झाले. आमिर खानने त्याच्या राहत्या घरातच खासगी पद्धतीने लग्न केले आहे. मुंबईतील वांद्रे येथील त्याच्या पालीहिल निवासस्थानी दोघांनी लग्नगाठ बांधली. आमिर खानचे हे तिसरे लग्न असून, गौरी स्प्रॅटचे हे दुसरे लग्न आहे. काही मोजक्या फॅमिली मेंबर आणि मित्रांच्या उपस्थितीत हा लग्न सोहळा पार पडला. काही महिन्यांपूर्वी आमिर खानने गौरीला मीडियासमोर आणले होते.**



दिखावा, किंवा बिग फॅट वेडिंग न करता आमिर खानने अगदी साध्या पद्धतीने लग्न करण्याचे ठरवले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, आमिर खान आणि गौरी स्प्रॅट यांचे लग्न झाले असून, त्यांनी राहत्या घरात अगदी साध्या पद्धतीने लग्न केले आहे. बॉलिवूडमधील कपल डेस्टिनेशन वेडिंग शिवाय करत नाहीत. पण आमिर खान आपल्या पर्सनल आयुष्यातील गोष्टी प्रायव्हेट ठेवायच्या होत्या. अगदी १०० ते १५० लोकांच्या उपस्थितीत त्यांचा हा विवाहसोहळा पार पडला. ज्यात कुटुंबातील काही सदस्य, जवळचे मित्र आणि इंडस्ट्रीतील काही मित्रांचा समावेश होता. आमिर खानच्या लग्नसोहळ्यात इरा खान, जुनैद खान देखील उपस्थित होते. तर, आमिर खानचा सर्वात लहान मुलगा आझाद आणि गौरीचा मुलगा देखील या लग्नसोहळ्यात उपस्थित होता. या खास लग्नसोहळ्यानिमित्त आमिर खान आणि गौरी स्प्रॅट या दोघांचीही फॅमिली एकत्र आली होती. सध्या या लग्न सोहळ्यातील एक फोटो सोशल मीडियात व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये हे जोडपे आमिर खान गौरी तसेच इतर परिवारातील सदस्य दिसत असून, आमिर खान मॅरेज डॉक्यूमेंटवर सही करत असल्याचं दिसत आहे. या लग्न सोहळ्यात आमिर खानची आई झीनत हुसेन देखील उपस्थित होती. या लग्नसोहळ्यात चित्रपट निर्माते आशुतोष गोवारीकर, एली अवराम, इरफान पठाण, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि वीर दास उपस्थित होते.


# नंदुरबार येथे सहकार दिन साजरा

नंदुरबार, दि.४(प्रतिनिधी)- सहकार भारती संघटनेच्या नंदुरबार जिल्हा शाखेतर्फे शनिवारी सहकार दिन साजरा करण्यात आला.

येथील पंडित दीनदयाल उपाध्याय पतपेढीच्या कार्यालयात शनिवारी सहकार दिनानिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी सहकार भारतीचे संस्थापक प्रणेते स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेस नंदुरबार सहकार भारती संघटनेच्या महिला आघाडी प्रमुख सुरेखा वळवी यांनी माल्यारर्पण केले.


याप्रसंगी सहकार भारती संघटनेचे नंदुरबार जिल्हा संघटनमंत्री महादू हिरणवाळे यांनी सांगितले की, जागतिक सहकार दिन दरवर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी जगभरात साजरा केला जातो. सहकार दिन कार्यक्रमास पंडित दीनदयाल उपाध्याय पतपेढीचे चेअरमन नानाभाऊ माळी, व्हाईस चेअरमन मोहन चौधरी, व्यवस्थापक पांडुरंग माळी, सहकार भारतीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष ॲड. के.आर.पाठक, ज्येष्ठ सदस्य प्राचार्य हिम्मतराव चव्हाण, बी.डी. गोसावी, बाबूलाल माळी, वैभव करवंदकर, महिला सदस्या किरण गायकवाड, मिनल परमार, दिपाली नांद्रे, तसेच सुदाम खैरनार, प्रसाद अर्थेकर, दरबारसिंग सोलंकी, जयेश मराठे, नितीन सांगळे, सुखदेव माळी,भास्कर देवरे, कमलेश कासार आदी उपस्थित होते.

**प्रकाश में आज पहेलीबार**




राजेश खन्ना, जया प्रदा, अमरीशपुरी, प्रेम चोपडा, मदनपुरी, सुरेश ओबेराय

**शब्दकोडे क्रमांक : २४०५**



**आडवे शब्द :** १.लहान किंवा वयाने लहान असणारा भाऊ ३.हताश६.मोठी शिळा ८.भारतीयांचे अतिशय लाडके आणि लोकप्रिय गरम पेय १०.कोलकाता येथील हुगळी नदीवरील प्रसिद्ध ऐतिहासिक पूल व रेल्वे स्टेशन १२.अंगठ्यापासून करंगळीपर्यंतच्या अंतराचे एक जुने माप १४.पहाटेच्या वेळी गवताच्या पानांवर पडणारे पाण्याचे थेंब १५.१६.दूध, साखर आणि तांदूळ/शेवया एकत्र करून बनवला जाणारा गोड पदार्थ १७.सोळा नंतर आणि अठरा पूर्वी येणारी संख्या १९.पाण्याचा लहान निसर्गनिर्मित प्रवाह किंवा नाला २०.पोपट२१. जुन्या काळात प्रकाशासाठी वापरले जाणारे काचेचे हातातील साधन २२.दूध आटवून तयार केला जाणारा खवा २३.अंगावरील शृंगार २४.मौजमजा,विलास २५.पाण्यामध्ये राहणारा एक प्रचंड आणि हिंस्त्र सरपटणारा प्राणी २७.अभिनेत्री रेवतीचा एक हिंदी भयपट २८.सखा, सोबती, दोस्त २९.मोठा प्रासाद ३१.जावावाद-उलट लिहा ३३.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील पेशवे 'मोरोपंत' किंवा एक आदरार्थी पदवी ३५.बुद्धिबळाच्या पटावरील राजाचा सर्वात शक्तिशाली प्रमुख प्रधान ३८.योग्य, रास्त दरातील ४२) तालासुरात रचिलेली पद्य रचना ४३.शस्त्राचा प्रहार किंवा शरीरावर झालेली जखम ४४.संभ्रम ४६.संकटातून तारून नेणारा ४९.डाकीण ५१.आपल्या सुंदर पिसारा आणि नृत्यासाठी प्रसिद्ध असलेला भारताचा राष्ट्रीय पक्षी ५२.नरकाधिपती ५३.रत्न ५४.हरणाचे पिल्लू **उभे शब्द :** आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी २.तळपायाचा उंचवठा ४.भेग ५.सान ६.कंकड ७.कलेची कदर करणारा ९.तडाखा ११.सिंह १३.त्रास १५.वनस्पतींचा कढवलेला रस १८.मऊशार १९.एक औषधी वनस्पती २१.फणी २२.संगीतातील एक राग २३.सप्त २४.मराठी कालगणनेतील पहिला महिना २६.चळवळ २७.नरेश २८.प्रियकर ३०.खेळातील एक हिस्सा वा बाजी ३२.वाणी ३४.पुज्यनीय स्त्री ३६.प्राण ३७.नाना तऱ्हेचे ३९.विष ४०.भारताच्या ईशान्येकडील एक सुंदर राज्य ४१.अपुरा ४५.धातूचा तंतू-इंग्रजीत ४६.एक पारंपरिक आदिवासी नृत्य ४७.अंदाज ४८.मोराच्या डोक्यावर डोलतो ५०.आदराने वाकलेला

**शब्दकोडे क्रमांक : २४०४ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | व | ना | ग | री | | दं | ग | ल | | ना | सा |
| व | | डी | | या | द | गा | र | | ग | | ग |
| ता | फा | | म | ल | म | | ज | म | | आ | |
| | र | च | ना | | ट | न | | द | गा | बा | ज |
| ता | क | | ई | द | | भ | री | त | | ळ | |
| प | त | न | | स | म | | ता | | पा | | दै |
| ट | | क | च | रा | | ती | | प | र | वा | ना |
| | म | टा | र | | म | न | न | | ध | ड | |
| व | ध | | खा | प | र | | वा | द | | गा | ठ |
| य | | को | | ग | ग | न | | म | ग | | ग |
| | सा | य | न | | ळ | | ग | ण | | रा | |
| प | थ | | र | द | | हा | ड | | सा | ज | न |








# रंगोत्सव आंतरराष्ट्रीय स्पर्धेत लिटल एंजल्स अकॅडमीची उत्तम कामगिरी

**नवापूर, दि.५ (प्रतिनिधी)- नवापूर एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित श्रीमती एस. एम. चोखावाला लिटल एंजल्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील रंगोत्सव स्पर्धेत नेत्रदीपक यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. यंदाच्या स्पर्धेत तब्बल १११ विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आंतरराष्ट्रीय पदके आणि आकर्षक पारितोषिकांवर आपले नाव कोरले.**

या उल्लेखनीय यशानिमित्त शाळेत दोन दिवसीय पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पहिल्या दिवशी ख्यातनाम कौन्सिलर श्रीमती शेफाली मॅडम, शाळेचे सभासद श्री. जिग्नेशभाई शहा, श्री. राजेशभाई अग्रवाल तसेच मुख्याध्यापिका डॉ. सिमरन अमोल दिवटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. दुसऱ्या दिवशी एज्युकेशन एक्स्टेन्शन ऑफिसर श्रीमती रेखा पवार, श्रीमती अनिता अग्रवाल आणि श्रीमती अर्चना शहा यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना जिओ लॅपटॉप, क्रिकेट किट, मिनी प्रोजेक्टर, म्युझिकल लर्निंग बुक, झेब्रॉनिक्स हेडफोन, रोलर स्केट्स, स्विमिंग पूल सेट, स्कूल बॅग, ट्रॉफी तसेच आंतरराष्ट्रीय पदकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.

स्पर्धेतील प्रमुख विजेत्यांमध्ये जस्मिता अमोल दिवटे, आयझल उमर मिर्झा, परिनिती विकी गावित, अविर प्रवीण शिरसाट, सलोनी हाबेल गावित, दर्शन सुनील निकवाडे, काव्य निमेश पांचाल, जैतून जुनेद खाटीक, निर्विका राकेश सोनवणे, काव्य ओमप्रकाश शर्मा आणि श्रीजय जगदीश वळवी या विद्यार्थ्यांचा विशेष समावेश होता. या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कलागुणांच्या जोरावर शाळेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केले.

यावेळी मुख्याध्यापिका डॉ. सिमरन अमोल दिवटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थी जागतिक स्तरावरही उल्लेखनीय यश मिळवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे अध्यक्ष श्री. विपिनभाई चोखावाला, कार्यकारी अध्यक्षा श्रीमती शितलबेन वाणी, उपाध्यक्ष श्री. शिरीषभाई शहा, सचिव श्री. राजेंद्रभाई अग्रवाल, सहसचिव श्री. शोहेबभाई मांदा तसेच संस्थेच्या सर्व सभासदांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या भव्य यशामुळे संपूर्ण नवापूर परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ललित पाटीलचे सीए परीक्षेत यश



नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- नुकत्याच जाहीर झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट अंतिम परीक्षेच्या निकालात धुळे (मुळगाव दापुरा )येथील ललित रवींद्र पाटील यांनी उल्लेखनीय यश संपादन करून प्रतिष्ठेची चार्टर्ड अकाउंटंट ही पदवी प्राप्त केली आहे. या यशाबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून तसेच कुटुंबीय, नातेवाईक यांच्याकडून कौतुक होत आहे. ललितच्या या उज्वल यशात त्याचे वडील निवृत्त मुख्याध्यापक रवींद्र पाटील व आई जयश्री पाटील यांचा मोलाचा वाटा आहे.



# डायमंड आणि प्लॅटिनम पुरस्काराने लायन्स फेमिनाच्या रंजना बोरसेंचा गौरव

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- पुणे येथे लायन इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ बहुप्रांतीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात नंदुरबार लायन फॅमिली एकूण पाच अवॉर्ड मिळाले. त्यात लायन रंजना बोरसे यांना डायमंड आणि प्लॅटिनम या अवॉर्डने गौरविण्यात आले.**

तसेच लायन सुप्रिया कोतवाल यांना डायमंड अवॉर्ड रागिनी पाटील यांना डायमंड अवॉर्ड, पिनल शहा यांना प्लॅटिनम अवॉर्डने गौरविण्यात आले. मल्टिपल कॉन्फरन्सला एकूण लायन्स क्लब नंदुरबार ५ अवॉर्डने गौरविण्यात आले.तसेच अकोला येथे डिस्ट्रिक्ट सेरेमनी पार पडला. त्यातही लायन्स क्लब फेमिना नंदुरबारच्या प्रेसिडेंट रंजना बोरसे यांना दोन डायमंड अवॉर्ड एक प्लॅटिनम अवॉर्ड एक गोल्ड अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. सुप्रिया कोतवाल यांनाही डायमंड अवॉर्ड तसेच रागिनी पाटील यांनाही डायमंड अवॉर्ड शहा यांना प्लॅटिनम अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. एकूण क्लबला ७ अवॉर्ड मिळाले. प्रेसिडेंट लायन रंजना बोरसे आणि सर्व टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.


## CHANGE NAME

My Old Name Was
**AYESHA BANO BINTE SHAMSUDDIN**
My New Name Is
**BIBI AYESHA ISRAR AHMAD ANSARI**
Add - S.No.575/1, Plot No. 33, Hafiz Siddik Nagar, Near Masjid Md. Hasan, Dhule-424001.

## CHANGE NAME

My Old Name Was
**ISRAR AHMED MUKHTR AHMED**
My New Name Is
**ISRAR AHMAD MUKHTAR AHMAD ANSARI**
Add - S.No.575/1, Plot No. 33, Hafiz Siddik Nagar, Near Masjid Md. Hasan, Dhule-424001.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : स. नं. ४३६/१ब+२+३ पैकी प्लॉट नं. ४२४चे एकूण क्षेत्र १५०.००चौ.मी.यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५.०० चौ.मी. बखळ प्लॉट.**

**सि. स. उताराप्रमाणे : सि. स.नं. १८०९८ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ. मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे मैमुदाबी शेख अकबर रा. प्लॉट नं. ४२४ जाम का मल्ला. सुल्तानिया नगर,** धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक मैमुदाबी शेख अकबर रा. प्लॉट नं. ४२४ जाम का मल्ला सुल्तानिया नगर, धुळे यांचे तर्फे विशेष मुखत्यार म्हणून १) मोहसीन अहेमद मुक्तार अहेमद २) मोबीन अहेमद मुख्तार अहेमद दोघे रा. २२२३ ग. नं. ७ मच्छीबाजार, धुळे यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क,हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे, दि. ०५/०६/२०२६

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे
मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, सरकारी व निम सरकारी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे निमडाळे ता. जि. धुळे हद्दीतील येथील गट नं. २३७/१ चे क्षेत्र ० हे. ९० आर आकार १ रु. ५५ पै. त्यासी चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

येणे प्रमाणे मिळकत ही १) राजेंद्र काळू लोहार उर्फ मिस्तरी, २) नरेंद्र काळु खैरनार उर्फ लोहार, ३) रविंद्र संजय लोहार उर्फ मिस्तरी ४) देविदास उर्फ दिनेश संजय लोहार उर्फ मिस्तरी, ५) अलकाबाई संजय लोहार उर्फ मिस्तरी यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे.

आमचे अशिल यांनी वरील वर्णनाच्या मिळकतीच्या मालकांशी कायमस्वरुपी विकत घेणेकामी सौदा केलेला असून बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे व मालकांनी बयाणा रक्कमेचा स्विकार केलेला आहे व अल्पावधित आमचे पक्षकार हे सदरचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी या मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. तसेच ते आमच्या अशिलांवर व सदर मिळकतीवरी बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्परवर्तमानपत्रात आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०५/०७/२०२६

**ॲड. अश्वीन देविदास देवरे**
पत्ता : रा. रावेर पो. दहयाने ता. जि. धुळे मो. ९१४६४५०३७७/ ८४१२०२४७८७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, सरकारी व निम सरकारी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे निमडाळे ता. जि. धुळे हद्दीतील येथील गट नं. २३७/२ चे क्षेत्र १ हे. ०३ आर आकार १ रु. ५५ पै. त्यासी चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.

येणे प्रमाणे मिळकत ही १) मिराबाई अशोक खैरनार, २) काशीनाथ अशोक खैरनार, ३) नरेंद्र अशोक खैरनार, ४) मीना कैलास जगताप, ५) सुभाष यादव लोहार उर्फ मिस्तरी, ६) दगडू यादव लोहार उर्फ मिस्तरी यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे.

आमचे अशिल यांनी वरील वर्णनाच्या मिळकतीच्या मालकांशी कायमस्वरुपी विकत घेणेकामी सौदा केलेला असून बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे व मालकांनी बयाणा रक्कमेचा स्विकार केलेला आहे व अल्पावधित आमचे पक्षकार हे सदरचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी या मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, करार, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. तसेच ते आमच्या अशिलांवर व सदर मिळकतीवरी बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्परवर्तमानपत्रात आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०५/०७/२०२६

**ॲड. अश्वीन देविदास देवरे**
पत्ता : रा. रावेर पो. दहयाने ता. जि. धुळे मो. ९१४६४५०३७७/ ८४१२०२४७८७

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५२३/२०२६

**१)हिराबाई भास्कर पाटील, २) महारु भास्कर पाटील,**
**३) राजेंद्र भास्कर पाटील, ४) मीनाबाई सतीश पाटील,**
**५) सुनंदाबाई भटू पाटील** ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. भास्कर फकीरा पाटील हे मौजे जनता नगर शिरपूर ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ३०/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ०१/०७/२०२६

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५७२/२०२६

**१) छाया सुनील फुलारी, २) राहुल सुनील फुलारी**
**३) पंकज सुनील फुलारी, ४) मीनल संदीप सूर्यवंशी,**
**५) देवांश संदीप सूर्यवंशी,६) प्रणव संदीप सूर्यवंशी**
सर्व रा. जैन गल्ली वरचे गांव शिरपूर जिल्हा धुळे ... अर्जदार
(अ.नं.४ स्वत: साठी व नं. ६ ची अ. पा.कर्ता म्हणून)

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार

कै. सुनील बाबुलाल फुलारी यांचा मृत्यू दि. २/६/२०२६ रोजी जैन गल्ली, वरचे गांव शिरपूर जिल्हा धुळे येथे मयत झाला आहे. अ. नं. १ ते ६ यांनी मे. शिरपूर येथील सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेषण कायदा १८२७ कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे. तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारस बाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत दि. ३०/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीला मार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येतील दि. ३०/०६/२०२६

आदेशावरुन

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५३९/२०२६

**१)नंदाबाई सतीष सोनार** रा. करवंद ता. शिरपूर जिल्हा धुळे.
**२) जसोदा उमेश मुंडके** रा. लक्ष्मी पांडुरंग अपार्टमेंट प्लॉट नं. ४ सर्व्हे नं. ४९, शांती नगर, ता. भुसावळ जिल्हा जळगांव
**३) नयना सुमित उदावंत** रा.हनुमान वाडी, ता. चाळीसगांव जि.जळगांव
**४) हर्षाली अविनाश सोनार** रा.करवंद ता. शिरपूर जि.धुळे.... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार

मयत कै. सतीष रामचंद्र सोनार यांचा मृत्यू दि. १७/७/२०२४ रोजी मौजे करवंद ता. शिरपूर जिल्हा धुळे येथे मयत झाले आहेत. अ. नं. १ ते ४ यांनी मे. शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेषण कायदा १८२७ कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे. तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारस बाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत दि. ३१/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीला मार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येतील दि. ०१/०७/२०२६

आदेशावरुन

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५०९/२०२६

**१) गुलाब खंडू कोळी** उ. व. ५०, धंदा : मजुरी
रा. जनता नगर, ता. शिरपूर जिल्हा धुळे.
**२) रतिलाल खंडू कोळी** उ. व. ४७, धंदा : मजुरी
रा. क्रांती नगर, ता. शिरपूर जिल्हा धुळे. ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार

कै. इंदुबाई खंडू कोळी यांचा मृत्यू दि. २७/१२/२०२४ रोजी मौजे क्रांती नगर शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाला आहे.अ. नं. १ व २ यांनी मे. शिरपूर येथील सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून, शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कव्विण्यात येते की, वरील मयत व वारस बाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येतील.

दि. ०१/०७/२०२६

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५९०/२०२६

**१) अखलाल मुसा मेहत्तर, २) रमजान मुसा मेहेत्तर**
**३) छोटी मुसा मेहत्तर, ४) मुन्नी मुसा मेहत्तर**
**५) शबाना बी शेख फिरोज** ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. शहनाज मुसा मेहत्तर हे मौजे टेक भिलाटी शिरपूर ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ३१/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ३०/०६/२०२६

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५०५/२०२६

**१) संजय मुरलीधर पाटील, २) राजू मुरलीधर पाटील,**
**३) ज्योती छोटू पाटील** ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. मुरलीधर ताराचंद पाटील हे मौजे बोराडी ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ३०/०६/२०२६ आदेशावरुन

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५८१/२०२६

**भगवान बळीराम भील, छगन बळीराम भील**
**देवकाबाई रोहिदास भील, रवींद्र रोहिदास भील** ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. बळीराम जयराम भिल हे मौजे कुरखळी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०४/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ३०/०६/२०२६

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५०३/२०२६

**१) सुमनबाई वामन पाटील, २) राजेंद्र वामन पाटील,**
**३) सुनिता सदाशिव पाटील, ४) सोनाबाई नथ्थु पाटील**... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. वामन नथ्थु पाटील हे मौजे जापोरे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ३०/०६/२०२६ आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५८४/२०२६

**१) मिना भिका माळी, २) शुभम भिका माळी,**
**३) भूमिका भिका भदाणे ४) प्रणाली भिका माळी**
**५) साक्षी भिका माळी वरील**
**सर्व रा. वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे** ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. भिका फकिरा माळी हे दि. ११/०४/२०२६ रोजी मौजे वाघाडी ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीरवारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ३१/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ०१/०७/२०२६ आदेशावरुन

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५०७/२०२६

**१) गुलाब खंडू कोळी** उ. व. ५०, धंदा : मजुरी
रा. जनता नगर, ता. शिरपूर जिल्हा धुळे.
**२) रतिलाल खंडू कोळी** उ. व. ४७, धंदा : मजुरी
रा. क्रांती नगर, ता. शिरपूर जिल्हा धुळे. ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार

कै. खंडू कौतिक कोळी यांचा मृत्यू दि. १४/११/१९८६ रोजी मौजे तऱ्हाड ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाला आहे.अ. नं. १ व २ यांनी मे. शिररपूर येथील सिव्हील जज्ज सो.ज्यु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून, शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे.

तरी सर्व सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कव्विण्यात येते की, वरील मयत व वारस बाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येतील.

दि. ०१/०७/२०२६

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५१३/२०२६

**१)सुरेखाबाई शांताराम भिल, २) शोभनील शांताराम भिल**
**३) सुदर्शन शांताराम भिल**,अ.नं.१ते३ रा.कुरखळी ता.शिरपूर जि. धुळे.
**४) शुभांगी सचिन भिल**
रा. सुकवद पो.विश्वनाथ ता.जि.धुळे. ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. शांताराम नवल भिल हे दि. २४/०५/२०२६ रोजी मौजे कुरखळी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शाासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कव्विण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ४/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि. ३०/०६/२०२६

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — सही.... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो.**
**ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५०२/२०२६
नि. नं. ६ चौ. ता.१७/७/२०२६

**१)बायजाबाई सोमजी पावरा, २) रहाबाई सतिराम पावरा**
**३) विरेंद्र सतिराम पावरा सर्व** रा. खंबाळे ता.शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

**सतिराम सोमजी पावरा** मयताचा पत्ता :खंबाळे ता.शिरपूर जि. धुळे
मृत्यू दि. २२/०३/२०२६ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचा मुलगा अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. ३ यांचे वडील नामे **सतिराम** सोमजी पावरा हे दि. २२/०३/२०२६ रोजी मौजे खंबाळे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्फ्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १७/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयतास वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही.... **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर — (कोर्टाचा शिक्का) — सही... **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय, शिरपूर

पान १ वरुन

## मुंबईच्या व्यावसायिकास निजामपूरजवळ लुटले

वाधवाणी २७ जूनला सिंदबनगाव येथे आले. शिवकुमार, मनोज कुमार (पूर्ण नाव समजू शकले नाही) यांनी वरुण वाधवाणी व सहकाऱ्यांना येथील डोंगर परीसरातील निर्जनस्थळी नेले. तेथे आठ जण अनोळखी तरुण आले. संगणमत करून वाधवाणी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. हाताने, बेल्टने मारहाण करून व्यवसायिकांकडून रोकडसह मुद्देमाल लुटला. तीन मोबाईल, बँकेचे क्रेडीट कार्ड, चांदीची चैन, ७५ हजार रुपये असा एकुण १ लाख २६ हजार ५०० रुपयांचा समावेश आहे. वरुण रामकुमार वाधवानी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार निजामपूर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक शेवाळे तपास करीत आहेत.

## गोतस्करीच्या वादातून मध्यरात्री हाणामारीची घटना

नदीवरील हाणामारी,साक्री नाक्यावर हल्ला करुन खुनाचा प्रयतक,तसेच जमावावर गाडी हाकण्याचा प्रयतक.अशा चार घटनांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.दहा पेक्षा अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले असून मध्यरात्री दिड नंतर घडलेल्या या घटनेचे पडसाद उमटण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हा पोलिस अधिक्षक आश्वीनी सामंत तसेच अपर पोलिस अधिक्षक आाशित कांबळे यांनी तातडीने सकाळी शांततेची बैठक बोलावली.कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये,असे आवाहन त्यांनी केले.कायदा हातात घेण्याचा कुणी प्रयतक.केला तर त्यांची गय केली जाणार नाही,असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## प्रकाश वाटा उपक्रमाला नवी ऊर्जा

माहिती दिली. आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि त्यांना मोठ्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रकल्प अधिकारी डॉ. चंद्रकांत पवार यांनी घेतलेल्या पुढाकाराचे यावेळी विशेष कौतुक झाले. कोठली येथील आश्रम शाळेत विद्यार्थिनींच्या पारंपरिक लेझीम पथकाने जिल्हाधिकारी डॉ मिताली शेठी यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. त्यानंतर घडलेला प्रसंग सर्वांसाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. जिल्हाधिकारी डॉ मिताली शेठी विद्यार्थिनींसोबत कोणताही औपचारिकपणा न ठेवता स्वतः त्यांच्या शेजारी बसल्या, त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि आदिवासी विद्यार्थिनींच्या मनातील भावना, स्वप्ने, अडचणी व अपेक्षा जाणून घेतल्या. शाळा आवडते का?, अभ्यासात काही अडचण आहे का?, भविष्यात काय बनायचे आहे? अशा आत्मीयतेने विचारलेल्या प्रश्नांमुळे विद्यार्थिनींचा संकोच दूर झाला आणि त्यांनीही मनमोकळेपणाने संवाद साधला.

जिल्हाधिकारी डॉ मिताली शेठी यांचा हा जिव्हाळ्याचा, आपुलकीचा आणि संवेदनशील संवाद पाहून आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी अक्षरशः भारावून गेले. प्रशासनातील सर्वोच्च अधिकारी स्वतः आपल्यामध्ये बसून आपल्या भावना जाणून घेत आहेत, ही बाब विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, आत्मविश्वास आणि उत्साह हा या भेटीचा सर्वात मोठा ठेवा ठरला. यावेळी दहावीच्या विद्यार्थिनींनी या झोपडीत माझ्या या प्रेरणादायी कवितेचे सामूहिक गायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थिनींच्या कलागुणांचे जिल्हाधिकारी डॉ मिताली शेठी यांनी मनापासून कौतुक करत त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि मेहनतीच्या बळावर ती पूर्ण करण्याचा संदेश दिला. भेटीदरम्यान महरित नंदुरबारफउपक्रमांतर्गत शासकीय माध्यमिक आश्रम शाळा नंदुरबार व शासकीय उच्च माध्यमिक आश्रम शाळा कोठली येथे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमालाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी परिविक्षाधीन आय ए एस अधिकारी अधिकारी डॉ. पंकज पटले, शिक्षण विस्तार अधिकारी निर्मल माळी, ट्रू टीचर्स संस्थेचे संस्थापक अरविंद सिंग तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाश वाटा हा उपक्रम केवळ नीट व जेईई चे प्रशिक्षण देणारा नसून, आदिवासी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी वाट खुली करणारा उपक्रम म्हणून नंदुरबार जिल्ह्यात विशेष आशेने पाहिला जात आहे.

## पंधरा नवोदित चार्टर्ड अकाउंटंट

मार्गदर्शन करताना डॉ. शिरीष शिंदे यांनी व्यावसायिक यशाबरोबरच आरोग्य आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तर डॉ. राजेश वसावे यांनी सीए विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सुदृढ ठेवत आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्याचे आवाहन केले. सीए परीक्षा ही देशातील अत्यंत कठीण परीक्षांपैकी एक असून सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी सीए फाउंडेशन व इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि नंदुरबार सीए असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सीए संतोष नानकानी यांनी केले, तर आभार सीए क्षितिजा अग्रवाल यांनी मानले. सीए दिनानिमित्त नेहरू चौक येथील राम मंदिरात अन्नदानाचा उपक्रमही राबविण्यात आला. कार्यक्रमस्थळी उभारण्यात आलेला सेल्फी पॉइंट उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला.

## हस्ती ग्रुप स्कूल तर्फे ग्राफिक डिझाईन

डिझायनिंग क्षेत्रातील विविध संधी व नाट्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आत्मसात करावयाची कौशल्यांचा विकास घडवणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होता.

या कार्यक्रमात ग्राफिक डिझायनिंगची कौशल्य व व संधींचा उलगडा मान्यवरांनी केला. व्यक्ती कलात्मक दृष्टिकोनातून उत्तम ग्राफिक डिझाईन बनवू शकतो. त्याकरिता आपल्या अंगी सर्जनशीलता असणे आवश्यक आहे असे संबोधिले. या क्षेत्रात विविध प्रतिष्ठित कंपन्यांची लोगो तयार करणे, त्याचबरोबर आकर्षक पॅकेजिंग डिझाईन व प्रिंटिंग फॉरमॅट तयार करून देणे डिजिटल मीडिया निमेशन यु. आय. यु. एक्स. डिझाईन सोशल मीडिया मार्केटिंग यांतील भरपूर संधी असल्याचे स्पष्ट केले. आपल्याला तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्तम करिअर घडवता येते असे विविध उदाहरणे देत स्पष्ट केले. त्यासोबतच व्यक्ती हा जन्मतः अभिनेता असतो फक्त त्याकरिता उपजत गुण व संधी मिळाली तर नटसम्राट घडू शकतो असे सांगत नाट्य क्षेत्राला आवश्यक कौशल्यांची माहिती दिली. यात नाट्यकलेत नामांकित नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा म्हणजे राष्ट्रीय ललित कला केंद्र याविषयी माहिती देत परीक्षेचे स्वरूप स्पष्ट केले.

या सत्रात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात मान्यवरांना प्रश्न विचारत मनातील शंका मांडल्या. मान्यवरांनी अत्यंत समर्पक व सुलभ भाषेत शंकांचे निरसन केले. मान्यवरांचे अनुभव विद्यार्थ्यांकरीता प्रेरणादायी ठरले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद पवार यांनी तर आभार राहुल भामरे यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता स्वप्निल माळी, सचिन पाटील, सागर गोराणे, विकास राजपूत यांनी परिश्रम घेतले. हस्ती स्कूलच्या वतीने आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या अंगी कला, कौशल्यांचा विकास साधण्यासाठी व व्यक्तिमत्व विकास तसेच आत्मविश्वास वाढवण्यासाठी अशा उपक्रमांचे नियमित आयोजन केले जाते.

## जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञांच्या गटात समावेश

कामगिरी करत जागतिक स्तरावर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठाचे व जी टी पाटील महाविद्यालय, नंदुरबार या याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांचे नंदुरबार तालुका विधायक समितीचे, मा.चेअरमन चंद्रकांतजी रघुवंशी व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य कबचौ उमवी जळगाव डॉ एम जे रघुवंशी संस्थेचे समन्वयक . उपप्राचार्य तसेच नंदुरबार तालुका विधायक समिती व जी.टी.पाटील महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील यशस्वी वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत

पान १ वरुन

## नागपूर मध्ये कुटुंबातील पाच जण घरातून गायब

जून रोजी सुरेश परसवानी यांच्या कुटुंबातील पाचही सदस्य कोणालाही काहीही न सांगता घरातून अचानक निघून गेले. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, ओळखीच्या लोकांकडे चौकशी केली, मात्र कोणाचाही काहीही सुगावा लागला नाही. अखेर हताश होऊन श्यामसुंदर परसवानी यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. हर्षा परसवानी (वय ५७ वर्षे), जितेंद्र परसवानी (वय ४२ वर्षे), इशिता परसवानी (वय ४० वर्षे), खुशी परसवानी (वय २१ वर्षे), कृष्णा परसवानी (वय १२ वर्षे) यांचा बेपत्ता असलेल्यांमध्ये समावेश आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असता, बेपत्ता असलेल्या सदस्यांपैकी एकावर मोठ्या प्रमाणावर कर्जाचा डोंगर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. कर्जबाजारीपणाला कंटाळून या कुटुंबाने हे पाऊल उचलले की यामागे काही वेगळे कारण आहे, याचा तपास पोलिस करत आहेत. दरम्यान, पोलिसांनी त्यांच्या मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता, सर्वांचे शेवटचे लोकेशन पुणे येथे आढळून आले आहे. हे सर्वजण स्वत:हून पुण्याला गेले की त्यांच्यासोबत काही घातपात झाला आहे? याचा तपास पोलिस करत आहेत.

## राम मंदिरातील दान चोरी झाँकी असेल तर

आधार शोधत होता. त्यावेळेला शिवसेनेचा भगवा शिवसेनाप्रमुखांनी शिवसैनिकांच्या हातात दिला. गैरफायदा घेतला गेला, नको ती लोकं सत्ता भोगत आहेत. हिंदू आजही भरडला जातोय,असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**तर... काशी मथुरा किती लुटतील.**

बारा वर्ष झालीत, आज आपण ज्यासाठी मेहनत केली होती. ती व्यक्ती पंतप्रधानपदी बसली आणि बसल्यानंतर कट्टर, कडवट हिंदुत्ववादी शिवसेनेला नष्ट करण्यासाठी जणू काही अफजलाखानी विडा उचलला. का उचलला. कारण, हिंदुत्वाचा गैरफायदा घ्यायचा होता. हिंदुत्वाचा गैरफायदा घेताना शिवसैनिक, एकच शिवसेना देशात अशी आहे, समोर उभी राहून निधड्या छातीने त्यांना प्रश्न विचारु शकेल. काय वातावरण होते. अयोध्या तो झांकी है, काशी मुथरा बाकी है. मला आता भीती वाटायला लागली, ही अयोध्येची झांकी असेल तर काशी मथुरा किती लुटतील, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

बारा वर्षात आपल्या भगव्याचे सरकार तिकडे आले असताना आपल्याला वाटत होते, अब हिंदू मार नही खायेगा. मात्र, हिंदूंना लुटणारे सरकार तेथे बसले हे आपले दुर्भाग्य आहे. पहिली सुरुवात शंकराचार्यांनी केली. केदारनाथातील सोने लुटले गेले. मध्यप्रदेशातील मुख्यमंत्र्यांवर उज्जैनमधील जमीन लुटली गेल्याचे आरोप झाले. बद्रीनाथमध्ये पण चोरीच्या बातम्या येत आहेत. अयोध्येत एक आयएएस ऑफिसर बोलतात, आईचे सोन्याचे दागिने वितळवले आणि एक किलोचा सोन्याचे मुलामा असलेले रामचरितमानस गायब झाले. नऊ नऊ तास बसवले जाते, पण उत्तर दिले जात नाही. शिवसेनेने फुल ना फुलाची पाकळी म्हणून काही पैसे दिलेले. चांदीच्या विटा दिल्या, कुठे गेले सगळे, असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी केला.

## नंदुरबार जिल्हा केळी बोर्डाच्या स्थापनेसाठी शहाद्यात

अभिजीत पाटील यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी आणि केळी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत केळी उत्पादक संघर्ष समिती नंदुरबार जिल्हा, रयत शेतकरी संघटना, नंदुरबार केळी व पपई फळ बागायतदार संघ, केळी उत्पादक शेतकरी संघ आणि जिल्ह्यातील विविध भागांतील केळी उत्पादक शेतकरी एकत्र आले होते.बैठकी दरम्यान नंदुरबार जिल्ह्यातील केळी उत्पादकांच्या अडचणी, केळीला मिळणारा बाजारभाव, निर्यातीच्या जागतिक संधी, शीतगृहे व साठवणूक सुविधा, केळीवरील प्रक्रिया उद्योग तसेच उत्पादनाच्या विपणनासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील वाढते केळी उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करता नंदुरबार येथे स्वतंत्र केळी बोर्डाची स्थापना तातडीने व्हावी, अशी जोरदार मागणी सर्व संघटना व शेतकऱ्यांनी एकमुखाने केली. केळी उत्पादक शेतकऱ्यांना आश्वस्त करताना आमदार राजेश पाडवी म्हणाले की, नंदुरबार जिल्हा केळी बोर्ड स्थापनेचा हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा राज्य विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात प्रभावीपणे मांडला जाईल. तसेच, राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे या मागणीचा सातत्याने आणि आग्रही पाठपुरावा करून नंदुरबार जिल्ह्यासाठी स्वतंत्र केळी बोर्ड मंजूर करून आणू, अशी ग्वाही त्यांनी दिली.या बैठकीमुळे जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, स्वतंत्र केळी बोर्डाच्या मंजुरीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## टँकर-कन्टेनरचा भीषण अपघात

बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. त्याचा होरपळून जागीच मृत्यू झाला. मृताचे नाव अद्याप समजू शकलेले नाही. मात्र त्याच्यासोबत एक सहचालकही असल्याची माहिती मिळत आहे. टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी तात्काळ सुरक्षित स्थळी धाव घेतल्याने स्वतःचे प्राण वाचवले. घटनेची माहिती मिळताच धुळे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे अधिकारी दुष्यंत महाजन यांच्यासह अमोल सोनवणे, विजय माळी, गोपाल माळी, सचिन करनकाळ, संतोष शिरसाठ आणि असलम शाह यांनी घटनास्थळी धाव घेतली. पारोळा आणि धुळे येथील अग्निशमन दलाच्या जवानांनी टँकरवर फोमचा मारा करत शर्थीचे प्रयतक करून आग आटोक्यात आणली. अपघातामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद करण्यात आली होती. पारोळा पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून वाहतूक नियंत्रित केली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

## मुंबईत वादळाने अडीचशे झाडे पडली

जिथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. दरम्यान, मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचले.त्यामुळे वाहतुकीवर देखील परिणाम झाला आहे.

**भूस्खलन, इमारती कोसळल्याच्या घटना**

गांधी नगर, अँटॉप हिल येथील क्राईम ब्रांच युनिट चार समोर एक झाड कोसळल्याने भूस्खलन झाले. वरळी डेअरी जवळ खान अब्दुल गफ्फार खान रोडवर एक रिकामी इमारत कोसळली. दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.पावसादरम्यान शहरात १५ शॉर्ट सर्किटच्या घटनांची नोंद झाली. यामध्ये शहरात चार, पूर्व उपनगरात तीन आणि पश्चिम उपनगरात आठ घटनांचा समावेश आहे. दिलासादायक बाब म्हणजे सकाळपासून शहर किंवा उपनगरात कुठेही पाणी साचल्याची नोंद झाली नाही. लोकल ट्रेन सेवा सामान्यपणे सुरू आहेत. तथापि, बारा ठिकाणी झाडे पडल्यामुळे बेस्ट बसचे मार्ग तात्पुरते वळवण्यात आले आहेत. बीएमसी आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. मुंबई पोलीस आणि अग्निशमन दलाची पथके कार्यरत आहेत. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत आणखी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मुंबईकरांमध्ये चिंता वाढली आहे. अनेक ठिकाणी झाडे पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली. प्रशासनाने नियमितपणे झाडांची छाटणी करावी आणि सुरक्षा उपाययोजना अधिक कडक कराव्यात, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

## पद्मविभूषण गायिका डॉ. तीजनबाईंनी

परदेशातही लोककलेला ओळख मिळवून दिली होती. बाराव्या वर्षी लग्न झाल्यानंतर तेराव्या वर्षी त्यांनी शेजारच्या गावात सार्वजनिक ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात आपली कला सादर केली होती. त्या सादरीकरणासाठी त्यांना दहा रुपये मिळाले होते. तीजनबाई यांनी पंडवानी हे कापालिक शैलीत केले होते. अशा शैलीत कला सादर करणारे तीजनबाई पहिल्या महिला ठरल्या होत्या.

## गंगामाई महा.विद्या.चे दोन विद्यार्थी झाले अग्निवीर




धुळे, दि.५ - देशसेवेची प्रेरणा आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर नगाव येथील गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील दोन छात्रसैनिकांनी मोठे यश मिळवले आहे. महाविद्यालयातील एनसीसी युनिटचे छात्रसैनिक हर्षल गोविंद माळी आणि ललित प्रकाश पाटील यांची नुकत्याच झालेल्या सैन्यदलाच्या भरतीत अग्निवीर म्हणून निवड झाली आहे.

सध्याच्या काळात युवकांमध्ये बेरोजगारी वाढत असताना, पोलीस व सैन्यदलाकडे तरुणांचा कल वाढला आहे. मात्र यासाठी शारीरिक तंदुरुस्ती सोबतच शिस्त आणि चिकाटी आवश्यक असते. महाविद्यालयीन जीवनात मिळणारे एनसीसीचे प्रशिक्षण यासाठी उपयुक्त ठरते, याचा प्रत्यय या निवडीमुळे आला आहे.

निवड झाल्यानंतर महाविद्यालयात या दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. यावेळी एनसीचे अधिकारी कॅप्टन डॉ. सुनिल पाटील आणि सीटीओ पूजा देवरे उपस्थित होते.

## अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल पालक ओरिएंटेशनला मोठा प्रतिसाद

**शिरपूर, दि.५ (प्रतिनिधी)- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पालकांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा आणि पालक यांच्यात सुसंवाद व सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन करत शाळेची कार्यपद्धती, शालेय नियम, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन.ई.पी.) याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन (एल.एस.आर.डब्ल्यू) या चार मूलभूत कौशल्यांचे महत्त्व स्पष्ट केले आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांच्या सक्रिय सहभागाची गरज अधोरेखित केली. यावेळी विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानाधारित आणि आनंददायी शिक्षणासाठी टुंडेमी किड्स लर्निंग पची माहिती देण्यात आली. या पच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार, प्रभावी आणि आधुनिक पद्धतीने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले.

यानंतर पालक-शिक्षक संघ (पी.टी.ए.) सदस्यांची निवड करण्यात आली. शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी पी.टी.ए. ची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सर्व शिक्षकांनी पालकांशी परिचय करून देत आपल्या वर्गातील अध्यापन पद्धती, शैक्षणिक नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पालकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. पालकांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक करत शाळेच्या सर्व शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रमांना पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या ओरिएंटेशन कार्यक्रमामुळे पालकांना शाळेची कार्यपद्धती, शैक्षणिक उद्दिष्टे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, भाषिक कौशल्य विकासाचे महत्त्व तसेच टुंडेमी किड्स लर्निंग पच्या वापराबाबत सविस्तर माहिती मिळाली. यामुळे पालक-शिक्षकांमधील संवाद अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग वाढण्यास निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे.

### निधन वार्ता

## डॉ.श्रीराम भतवालांच्या बंधूचे दुख:द निधन



धुळे,दि.५ - येथील गंगाराम हॉस्पिटलचे प्रमुख व प्रसिद्ध डॉ. श्रीराम भतवाल यांचे थोरले बंधू गोपाल रामेश्वर भतवाल यांचे शनिवार दि.४ जुलै रोजी दुख:द निधन झाले होते. रविवार दि.५ रोजी दुपारी चार वाजता ८-ब, ओमकार सुगंध नगर, पोरके नगर जवळ, डी मार्टच्या मागे मालेगाव रोड धुळे येथून त्यांची अंत्ययात्रा निघून एकविरा देवी जवळील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले.

## बलराज मगरांचा बंधूंचे निधन



धुळे,दि.५ - महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे राज्याध्यक्ष अण्णा साहेब बलराज मगर यांचे लहान बंधू कष्टम ऑफिसर कालकतीत भास्करराव बुद्धाची मगर यांचे आज दुपारी साडेबारा वाजता दु:खद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उल्हासनगर नंबर चार येथून सायंकाळी साडेसात वाजता निघणार आहे. कालगतीत तात्यासाहेब भास्करराव मगर यांच्या स्मृतीस खैरनार परिवार व अमृतसागर परिवारातर्फे विनम्र आदरांजली.

## जिल्ह्यातील धरणात केवळ ३७ टक्के पाणीसाठा

धुळे, दि. ५ : जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने धरणांमधील पाणीसाठा गेल्या वर्षाच्या तुलनेत कमी आहे. जिल्ह्यातील धरणांमध्ये सध्या सदतीस टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. पांझरा धरणात टक्के पाणीसाठा आहे. जामखेडी धरणाचा अपवाद असून या धरणात शंभर टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे. पुरेसा पाणीसाठा आणि खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा आहे.

## मोहिदे शाळेत राष्ट्रीय डॉक्टर दिवस साजरा

शहादा,दि.४(प्रतिनिधी)- तालुक्यातील मोहिदा त.श. येथील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकिय निवासी शाळा व साने गुरुजी मित्र मंडळ शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्यात आला.

दरवर्षी डॉ.बिधान चंद्र राय यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त दि.१ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्यात येतो. मोहिदे येथे झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लोणखेडा कॉलेजचे प्राचार्य डॉ.एम के पटेल होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. स्मिता जैन, साने गुरुजी मंडळाचे अध्यक्ष माणक चौधरी, सचिव डॉ.विवेक नगीन पाटील, सदस्या स्वाती पाटील, आशा चौधरी, मुख्याध्यापक रविदास वळवी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.एम के पटेल, डॉ.स्मिता जैन, डॉ. विवेक पाटील, रविदास वळवी यांनी मार्गदर्शन केले.



## मदन दाळवाले तेराव्या वर्षी अमरनाथ यात्रेसाठी रवाना

**धुळे, दि. ५ : येथील सामाजिक कार्यकर्ते आणि परम भोलेभक्त मदन तात्या दाळवाले सालाबादप्रमाणे या वर्षीही सलग तेराव्या वर्षी बाबा अमरनाथ यात्रेस सहकुटूंब व मित्रांसह रवाना झाले आहेत. या वेळेस ते कुटुंब आणि मित्रांच्या ग्रुपसोबत यात्रा करत आहेत. यात्रेदरम्यान ते ओंकारेश्वर, उज्जैन, जम्मु, पहलगाम बाबा अमरनाथ यात्रा, बालताल, खिर भवानी माता, श्रीनगर, वैष्णोदेवी, शिवखोरी या तीर्थस्थळांना देखील भेटी देणार आहेत.**

मदन दाळवाले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सोबत धुळ्यातील भरपूर ग्रुप व मित्र मंडळ सदस्यांची यात्रा होत असते. या वेळेस त्यांच्या समवेत पत्नी मनिषा दाळवाले, सिध्दी दाळवाले, नियती दाळवाले, तुषार गर्दे, अश्विनी गर्दे, अभिजीत भुनीया, शैली भुनिया, सोमनाथ पाटील, विजया पाटील, सागर पवार, पुनम पवार, अमोल पवार, कोमल पवार, अभिषेक जैन, दिपक भोई, हेमंत गुरव, जय मराठे, करण दाळवाले, पवन दाळवाले, योगेश बडगुजर, रविंद्र बडगुजर, अशोक बडगुजर व इतर भाविक रवाना झाले आहेत. अमरनाथ यात्रेबद्दल त्यांना राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह डॉक्टर्स, पत्रकारांनी शुभेच्छा दिल्या.

**पाहिजेत**

पाण्याचे जार वाटपसाठी माणसे पाहिजेत. आकर्षक पगार मिळेल समक्ष भेटा!
बुऱ्हानी आईस फॅक्टरी
यल्लमा देवी मंदिरासमोर, मालेगावरोड, धुळे
8208755681

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**

कलर दुकानासाठी बिल बनवण्याकरीता मुलगी/महिला पाहिजेत.
बाबजी पेंन्टस्
देवपूर, धुळे
9730255252
8766771033

**दुकान विकणे आहे**

फॉरचुन प्लाझा शॉप नं.११, संतोषी माता चौक, ओस्वाल बोर्डींगच्या शेजारी, सुयोजित लॅबच्या बाजुला ग्राऊंड फ्लोअर
8806950799

**प्लॉट विकणे आहे**

देवपूर शिवार S.N.92 येथील (इंडस्ट्रीयल) ५५०० स्क्वे.फुट प्लॉट योग्य किंमत आल्यास देणे आहे.
-: संपर्क :-
9623608264

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...




59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०